


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ७० वा | मंगळवार, दि. ०६ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# एका दिवसात महाराष्ट्र बंद नाही केला तर नाव बदलेन- जरांगे पाटील

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** एमपीएससीच्या अध्यक्षाच्या राजीनाम्यासाठी तसेच आपल्या इतर काही मागण्यांसाठी पुण्यामध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरू आहे.

या आंदोलनाला आता मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी भेट दिली. यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. तुमच्यासाठी सगळा महाराष्ट्र बंद करू असा इशाराही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

### नेमकं काय म्हणाले जरांगे पाटील?

महाराष्ट्रमध्ये जे जे कायं होतंय. ते तरुणांच्या हिताचं होतंय. माझं पुण्यनगरीतून सगळ्या विद्यार्थ्यांना आवाहन आहे, तुम्हाला थोडाही कलंक लागू नये, तुमचे आई-वडील तुमची घरी वाट पहात आहेत. मुलाला नोकरी मिळाली तर कितीही दुष्काळचं संकट आलं तरी काही फरक पडणार नाही. यांना मस्ती आली आहे, तुमच्यासाठी सारा महाराष्ट्र बंद करतो, असं



यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. तसेच हे आंदोलन राजकीय कसं काय? विद्यार्थ्यांना बळ दिलं नाही पाहिजे का? असा सवालही यावेळी जरांगे पाटील यांनी उपस्थित केला आहे.

मला सकाळपासून फोन चालू आहेत, तिकडे जाऊ नको. मला कायं विकत घेतलं की काय तुम्ही. कशालाही फोन करता. मी डोक्यावर घेतले होते. आपले आपले म्हणून. मी जर जातीवादी असतो तर इकडे आलो नसतो. राजीनामा द्यावाच लागेल, काय नाव ठेवलं तर भीमनवार नाव पाट करता करता मला दोन दिवस लागले असं म्हणत त्यांनी यावेळी एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्यावर देखील जोरदार हल्लाबोल केला आहे. फडणवीस तुम्ही त्यांचे प्रवक्ते म्हणून काम करता का? सरकारने त्यांना एक दिवसात काढून टाकावे, आहे गरीबाचा पण एकटा लढतो. महाराष्ट्र बंद नाही केला तर नाव बदलून टाकीन, गरीबाची मुलं अधिकारी होऊ नये असं तुम्हाला वाटतं का? तुम्ही गरिबांच्या आई-वडिलांनी पाहिलेल्या स्वप्नांचा चुराडा करत आहात, असंही यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

# 'मराठी मुलांना नोकऱ्या मिळणार असतील तर कुणाचेही पाय धरायला तयार'- राज ठाकरे

MPSC च्या विद्यार्थ्यांचं जे आंदोलन सुरू आहे त्या आंदोलनाला राज ठाकरेंनी पाठिंबा दिला आहे. आज त्यांनी पुण्यात या आंदोलनाला भेट दिली. सरकारी फसवणुकीमुळे आपल्या आयुष्यातला उमेदीचा काळ कसा जातो हे माझ्यापेक्षा जास्त कुणी सांगू शकणार नाही.

देशभरात जे काही आंदोलन सुरू आहे, मुंबईत आंदोलन झालं परवा. तुमच्याकडे पेपर फुटत आहेत आणि आमच्याकडे मतं फुटत आहेत. बळी दोघेही जात आहोत, पण या सगळ्या गोष्टींमुळे एक एक वर्ष पुढे जातं. जशी तुमच्या आयुष्यातून वर्षे निघून जातात तशी आमच्याही आयुष्यातून जातात असं राज ठाकरेंनी म्हटलं आहे.

### संपूर्ण देशात बेधुंदशाही सुरू आहे-राज ठाकरे

संपूर्ण देशभरात बेधुंदशाही सुरू आहे. कुणीही कुणाचं ऐकायला तयार नाही. एकाच बाजूने फक्त मन की बात सुरू आहे. जणू काही दुसऱ्या बाजूला मनच नाही असं म्हणत राज ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही टोला लगावला.राज ठाकरे पुढे म्हणाले, मला वाटतं की इथे रोज कुणी तरी येणार भाषण करणार आणि टाळ्या आणि हशा पिकणार यात वेळ घालवू नका. मी तुम्हाला माझं मत सांगतो, माझा पुनर्जन्मावर विश्वास नाही. या आयुष्यातली वर्षे सरत आहेत. आयुष्य पुढे पुढे



जातं आहे. निवडणुका लढवल्यावर आम्हाला कळतं की मतचोरी झाली आहे. अनेक गोष्टी झाल्यावर कळतं आणि दरवेळी पाच-पाच वर्षे निघून जातात. समोर बघितलेला लहान मुलगा एवढा मोठा होतो. तुमची वेदना मला कळू शकते.

### देशातली आणि महाराष्ट्रातली परिस्थिती लक्षात घ्या-राज ठाकरे

देशातली आणि राज्यातली परिस्थिती काय आहे? जरा लक्षात घ्या. धार्मिक गोष्टींमध्ये तुम्हाला अडकवलं जातं आहे. कारण रोजच्या विषयांमध्ये तुमचं लक्ष जाऊच नये. जातीपातीचं काहीतरी उकरून काढा. घरी जाऊन आई वडिलांना काय तोंड दाखवणार तुम्ही? हा मराठा, हा माळी, हा धनगर हे सगळं निर्माण केलं जातं आहे. आधी या जातीपातींमधून बाहेर या. मराठवाड्यातून अनेक मुलं पुण्यात शिकायला आली आहेत. रोज अभ्यास करत आहेत, नशिबात काय? पेपर फुटला आहे. तुम्ही हा जो तुमचा राग आहे तो कायम ठेवणं अशक्य आहे. मी तुमच्याशी बोलतो ते सत्य असतं, कडवट असतं पण ते सत्य असतं. कालांतराने कळतं की मी बरोबर बोललो होतो.

### ७० हजारांची पद भरती होणार नाही हे आज सांगतो-राज ठाकरे

७० हजार मुलांची पद भरती आज सांगतो होणार नाही. हे सगळं आत्ताच लक्षात ठेवा. रोहित पवार या ठिकाणी आहे. दुसरं सरकार आलं तरीही मागणी पूर्ण होऊ शकत नाही हे तुम्हाला सांगतो याचं कारण परिस्थिती आहे. नोकऱ्या मात्र मिळाल्याच पाहिजेत. महाराष्ट्रातल्या नोकऱ्या, काम धंदे मराठी मुला-मुलींना मिळाले पाहिजेत. तुम्हाला जर या गोष्टी मिळाल्या तर आंदोलनांची गरजच उरणार नाही. आपण म्हणतो आरक्षण पाहिजे, सरकारी नोकऱ्या आहेत कुठे? जे काही मिळेल ते खासगी होत चाललं आहे. दिसली जमीन दे अदाणीला, दिसलं विमान दे अदाणीला. सगळ्या गोष्टी खासगी होत आहेत, त्या क्षेत्रात आरक्षण नाही. तुमचा विचार कुणीही करत नाही, कारण तुम्हाला गृहीत धरलं जातं. निवडणुका आल्यानंतर जेवणावळी होतात, पैसे दिले जातात, दारू दिले जाते. त्यातून निवडणुका जिंकल्या जातात. अशातून निवडून आलेल्यांचा गैरसमज तुम्ही दूर करत नाही तोपर्यंत न्याय मिळणार नाही हे लक्षात ठेवा. पक्ष बदलणाऱ्यांनाही लोक निवडून देतात. तुम्ही जर शिक्षा करायची ठरवली तर सगळे सुतासारखे सरळ होतील. तुम्ही त्यांच्या मनात भीती निर्माण करत नाही तोपर्यंत काही होणार नाही असंही राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्रातल्या मराठी मुलांना आणि मुलींना नोकऱ्या मिळणार असतील तर राज ठाकरे कुणाचेही पाय धरायला तयार आहे. वस्तुस्थिती काय आहे ते समजून घ्या. तुमचा दबाव वाढला पाहिजे. दबाव काय असतो ते सरकारला कळलं पाहिजे आणि तातडीने त्यांनी पावलं उचलली पाहिजे. मी आज तुम्हाला भेटायला आलो आहे. मी अनेकदा जे बोलतो ते कटू असतं. हळूहळू लोकांना हे समजू लागलं आहे. लवकरच हा प्रश्न मार्गी लागेल अशी अपेक्षा बाळगू असंही राज ठाकरेंनी म्हटलं आहे.

# उजनीतील एआय प्रकल्पांबाबत खा. धैर्यशील मोहिते-पाटलांचे सरकारला विचारले २२ प्रश्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** उजनी जलाशय परिसरात प्रस्तावित असलेल्या एआय कॅम्पस, डेटा सेंटर, फ्लोटिंग सोलर आणि ग्रीन हायड्रोजन प्रकल्पाच्या पाणीवापरासह पर्यावरणीय व सामाजिक परिणामांबाबत लोकसभेचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी जिल्हा प्रशासनाकडे सविस्तर माहिती आणि प्रमाणित अहवाल मागविला आहे. या प्रकल्पामध्ये ४४० मेगावॅट क्षमतेची लघु मॉड्युलर अणुभट्टी (SMR) प्रस्तावित आहे का?, याबाबतही शासनाने अधिकृतपणे स्पष्ट करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

महाराष्ट्र शासन, संबंधित जागतिक उद्योग समूह आणि कन्सोर्टियम यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने उजनी जलाशय परिसरात हे प्रकल्प प्रस्तावित असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. उपलब्ध माहितीनुसार या प्रकल्पासाठी सुमारे १५ अब्ज युरोची गुंतवणूक, पहिल्या टप्प्यात सुमारे ६८० एकर क्षेत्रावर ९,४०० मेगावॅट क्षमतेचा एआय कॅम्पस व डेटा सेंटर तसेच प्रतिवर्ष सुमारे ६,९०५ टन ग्रीन हायड्रोजन निर्मिती प्रस्तावित असल्याचे सांगण्यात आले आहे.

### २ टीएमसी पाण्याची गरज; हिशेब स्पष्ट करण्याची मागणी

प्रकल्पासाठी सुमारे २ टीएमसी पाणी आवश्यक असल्याच्या माहितीचा आधार, हा पाणीवापर कोणत्या कालावधीसाठी आहे, याचा खुलासा करावा, अशी मागणी मोहिते-पाटील यांनी केली आहे. बांधकामाच्या काळात तसेच प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर शीतकरण, स्वच्छता, औद्योगिक प्रक्रिया, ग्रीन हायड्रोजन निर्मिती आणि अन्य वापरासाठी दररोज, दरमहा व दरवर्षी किती पाणी लागणार, याचा स्वतंत्र तपशील मागविण्यात आला आहे.

उजनी जलाशयावर सोलापूर जिल्ह्यासह लाभक्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या योजना, शेती, सिंचन, मत्स्यव्यवसाय आणि स्थानिक उपजीविका अवलंबून आहेत. त्यामुळे विद्यमान पाणी आरक्षण, प्रत्यक्ष वापर, अपूर्ण योजनांची भविष्यातील मागणी आणि प्रस्तावित नवीन योजनांची गरज यांचा एकत्रित पाणी ताळेबंद सादर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

### दुष्काळी वर्षात प्रकल्पाचा पाणीवापर कसा रोखणार?

सामान्य, कमी पर्जन्यमानाच्या तसेच दुष्काळी वर्षातील उजनीतील पाणी उपलब्धतेचे विश्लेषण करून विद्यमान पिण्याच्या पाणीपुरवठा व सिंचन योजनांवर प्रकल्पाच्या पाणीवाटपाचा काय परिणाम होईल, हे



स्पष्ट करावे. पाण्याची कमतरता निर्माण झाल्यास पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देऊन प्रकल्पाचा पाणीपुरवठा कमी अथवा नियंत्रित करण्याची यंत्रणा काय असेल, याची माहितीही मागविण्यात आली आहे.

### फ्लोटिंग सोलरमुळे किती पाणी वाचणार?

फ्लोटिंग सोलर प्रकल्पामुळे बाष्पीभवन कमी होऊन पाणी बचत होणार असल्याचा दावा केला जात असल्यास त्यासाठी स्वतंत्र वैज्ञानिक अभ्यास सादर करावा, अशी मागणी आहे. त्याचबरोबर शीतकरण प्रणालीमध्ये प्रति युनिट वीज निर्मितीसाठी किती पाणी लागेल, त्याचा पुनर्वापर किती होईल आणि कमी पाणी वापरणाऱ्या तंत्रज्ञानाचा अवलंब केला जाणार का, याचाही तपशील मागविण्यात आला आहे.

### सांडपाणी उजनीत सोडणार का?

प्रकल्पातून निर्माण होणारे सांडपाणी, औद्योगिक प्रक्रिया अवशेष, रसायने व इतर द्रव कचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जाणार, याची माहिती मागविण्यात आली आहे. प्रक्रिया केलेले अथवा गरम पाणी जलाशयात सोडण्याचा प्रस्ताव असल्यास त्यासाठीची मानके, परवानग्या, निरीक्षण व्यवस्था आणि उजनी जलपरिसंस्थेवरील संभाव्य परिणाम स्पष्ट करावेत, असे पत्रात म्हटले आहे.

### शेतकरी, मच्छीमारांच्या उपजीविकेचे काय?

फ्लोटिंग सोलरसाठी वापरल्या जाणाऱ्या जलक्षेत्रामुळे मच्छीमारीची ठिकाणे व बोटमार्गावर होणारे संभाव्य परिणाम, बाधित मच्छीमार कुटुंबांची संख्या तसेच त्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास सादर करण्याची मागणी करण्यात आली आहे. बाधितांना भरपाई अथवा पर्यायी उपजीविकेच्या योजना काय असतील, हेही स्पष्ट करण्यास सांगितले आहे.

प्रकल्पामुळे जैवविविधता, स्थलांतरित व स्थानिक पक्षी, जलचर, मत्स्यसंपदा, पाणथळ क्षेत्र आणि स्थानिक पर्यटनावर होणाऱ्या एकत्रित परिणामाचा अभ्यास करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

### तापमान ५ ते ८ अंशांनी वाढणार?

प्रकल्पामुळे परिसरातील तापमानात ५ ते ८ अंश सेल्सिअस वाढ होण्याच्या दाव्याची वैज्ञानिक पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तापमान, आर्द्रता, बाष्पीभवन आणि जलपरिसंस्थेवरील परिणामाबाबत उपलब्ध वैज्ञानिक अभ्यास अथवा हवामान मॉडेलिंग अहवाल शासनाने उपलब्ध करून द्यावा, असे मोहिते-पाटील यांनी म्हटले आहे.

### ४४० मेगावॅट अणुभट्टीचा प्रस्ताव आहे का?

प्रस्तावित प्रकल्पाच्या अनुषंगाने भविष्यात वीज निर्मितीसाठी आण्विक रिॲक्टर किंवा लघु मॉड्यूलर रिॲक्टर (SMR) उभारण्याची चर्चा होत असल्यास त्याचे स्वरूप, कोणत्या घटकासाठी त्याचा वापर होणार, तसेच त्यासाठी कोणत्या शासकीय विभागांकडून मान्यता किंवा प्राथमिक अभ्यास करण्यात आला आहे, याची माहिती मागविण्यात आली आहे.

विशेषतः ४४० मेगावॅट क्षमतेच्या KAERI SMART-C लघु मॉड्युलर अणुभट्टीचा समावेश असल्यास, तिची स्थळनिवड, सुरक्षा, पाणी व शीतकरणाची गरज, किरणोत्सर्ग सुरक्षा, अणुकचरा व्यवस्थापन, आपत्कालीन आराखडा आणि आवश्यक वैधानिक मंजुऱ्यांची सद्यस्थिती स्वतंत्रपणे जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अणुभट्टीचा कोणताही प्रस्ताव नसल्यास शासनाने तेही अधिकृतपणे स्पष्ट करावे, जेणेकरून नागरिकांमधील संभ्रम दूर होईल, असे पत्रात नमूद आहे.

### ६८० एकर जमिनीचा तपशील मागविला

प्रस्तावित ६८० एकर क्षेत्रासह रस्ते, वीजवाहिन्या, पाइपलाइन व अन्य पायाभूत सुविधांसाठी लागणाऱ्या अतिरिक्त जमिनीचा तपशील, संबंधित गावे, सर्वे क्रमांक, मालकी हक्क, जमिनीचा प्रकार, पूररेषा आणि संभाव्य बाधित क्षेत्राची प्रमाणित माहिती देण्याची मागणी करण्यात आली आहे. बाधित नागरिकांची संख्या, पुनर्वसन, भरपाई आणि जमीन अथवा (पान 2 वर..)

# शरद कोळींवर MPDA अंतर्गत कारवाई

## १ वर्षासाठी येरवड्यात रवानगी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे उपनेते शरद विठ्ठल कोळी (वय ३७, रा. अर्धनाही, ता. मोहोळ) यांच्यावर सोलापूर ग्रामीण पोलिसांनी 'एमपीडीए' (MPDA) कायद्यांतर्गत अत्यंत कठोर कारवाई केली आहे.

या कारवाईनुसार शरद कोळी यांना एका वर्षासाठी पुण्यातील येरवडा मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वी एका गुन्ह्यात फरार असलेल्या शरद कोळी यांना पोलिसांनी सांगली येथून ताब्यात घेतले होते. त्यानंतर सोलापूरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी १७ सप्टेंबर २०२६ रोजी काढलेल्या आदेशानुसार ही स्थानबद्धतेची कारवाई निश्चित करण्यात आली. रविवारी (४ ऑक्टोबर) पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयात त्यांची रीतसर वैद्यकीय तपासणी पूर्ण करून कडक पोलीस बंदोबस्तात येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली.

पंढरपूर तालुका पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोळी



यांच्यावर सोलापूर व आसपासच्या परिसरात अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. वाळू चोरी आणि तस्करी, व्यापारी व नागरिकांकडे खंडणी मागणे, तसेच सार्वजनिक ठिकाणी प्रक्षोभक भाषणे देऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणे, अशा विघातक कृत्यांची दखल घेत ही कारवाई करण्यात आली आहे. 'एमपीडीए' कायद्याच्या कलम ३(१) अन्वये पोलिसांकडून हे पाऊल उचलण्यात आले आहे.

सत्ताधाऱ्यांवर आक्रमक भाषेत टीका करणारे नेते म्हणून शरद कोळी यांची ओळख आहे. आगामी विधानसभा आणि स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर थेट एक वर्षाच्या स्थानबद्धतेची कारवाई झाल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.






# ऊसतोड कामगारांना शासन निर्देशानुसार सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात- जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा गाळप हंगाम १५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर ऊसतोड कामगारांना शासनाने निर्धारित केलेल्या निकषांनुसार आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांनी ऊसतोड कामगारांच्या वर्षभरातील अपघातांची संपूर्ण माहिती समाज कल्याण विभागाकडे सादर करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात आयोजित लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी मार्गदर्शन करत होते. यावेळी समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त




सुलोचना सोनवणे, जिल्हा शल्य चिकित्सक वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी सतीश कोपूरवाड, प्रादेशिक सह आयुक्त साखर यांचे प्रतिनिधी तसेच साखर कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी साखर कारखान्यांनी कामगारांची योग्य नोंदणी करणे, निवासाची व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छता व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. कामगारांच्या मुलांसाठी शाळा, शिक्षण तसेच आवश्यक त्या इतर सुविधा उपलब्ध होतील, यासाठी संबंधित साखर कारखान्यांनी नियोजन करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या.

### प्रत्येक साखर कारखान्यावर आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे

ऊसतोड कामगारांच्या आरोग्याची नियमित तपासणी होण्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाने प्रत्येक साखर कारखान्यावर आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे. या शिबिरांमध्ये जास्तीत जास्त ऊसतोड कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात यावी. तसेच

### २७ अपघात प्रकरणे प्राप्त; १७ प्रस्ताव कागदपत्रांच्या पूर्ततेसह

समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी ऊसतोड कामगारांसाठी राबविण्यात येत असलेल्या लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अपघात अनुदान योजनेची माहिती दिली. जिल्ह्यातील एकूण ३८ साखर कारखान्यांपैकी १७ साखर कारखान्यांनी ऊसतोड कामगारांच्या अपघातासंदर्भातील माहिती समाज कल्याण विभागाकडे सादर केली आहे. या अनुषंगाने एकूण २७ प्रकरणे प्राप्त झाली असून, त्यापैकी १७ प्रकरणांतील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झालेली आहे. या परिपूर्ण प्रकरणांना नियमानुसार मंजुरी द्यावी, असे सहाय्यक आयुक्त श्रीमती सोनवणे यांनी बैठकीत सांगितले.

आवश्यकतेनुसार पुढील उपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी दिले.

कामगारांच्या मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये, यासाठी साखर कारखाने, संबंधित विभाग आणि स्थानिक यंत्रणांनी समन्वयाने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

ऊसतोड कामगारांच्या सुरक्षिततेबरोबरच त्यांच्या आरोग्य, निवास, पिण्याचे पाणी, स्वच्छता, मुलांचे शिक्षण आणि सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने शासनाच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी आणि साखर कारखान्यांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.



## संपादकीय

# रुग्णांच्या खिशावर नफेखोरीचा घाव!

रुग्णालयात दाखल झालेला माणूस आणि त्याचे कुटुंबीय आधीच मानसिक, शारीरिक आणि आर्थिक तणावातून जात असतात. अशा वेळी सलाइन सेट, सिरिंज, कॅथेटर, ऑक्सिजन मास्क किंवा कर्करोगावरील औषधांची खरी किंमत किती आहे, याची माहिती रुग्णाला नसते. छापील एमआरपी हीच त्याच्यासाठी अंतिम किंमत ठरते. या माहितीच्या अभावाचा फायदा घेत रुग्णालये, वितरक आणि विक्रेत्यांकडून अवाजवी नफा आकारला जात असेल, तर हा केवळ व्यापाराचा विषय राहत नाही; तो सार्वजनिक आरोग्य आणि रुग्णांच्या हक्कांचा प्रश्न बनतो. महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केंद्र सरकारसमोर मांडलेल्या बाजार सर्वेक्षणातील आकडेवारीने या प्रश्नाचे गांभीर्य अधोरेखित केले आहे. सर्वेक्षणानुसार, सुमारे २९.४१ रुपयांना खरेदी केलेल्या कॅथेटरची एमआरपी ३१० रुपये होती, तर ११.०५ रुपयांना खरेदी केलेल्या आयव्ही इन्फ्युजन सेटसाठी रुग्णाकडून ३२५ रुपये आकारले गेले. काही प्रकरणांत खरेदी किंमत आणि एमआरपीमधील फरक २,८४१ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे नमूद करण्यात आले आहे. ही आकडेवारी जर तपासणीतही खरी ठरली, तर नियमनाच्या विद्यमान व्यवस्थेतील गंभीर त्रुटी समोर येतात. रुग्णालयात दाखल असलेला रुग्ण अनेकदा बाहेरून औषध किंवा वैद्यकीय उपकरण खरेदी करू शकत नाही. त्याला डॉक्टरांनी लिहून दिलेला ब्रँड आणि रुग्णालयाने उपलब्ध करून दिलेली वस्तू स्वीकारण्याशिवाय पर्याय राहत नाही. त्यामुळे तो 'बंदिस्त ग्राहक' बनतो. अशा परिस्थितीत एमआरपी आणि प्रत्यक्ष खरेदी किंमत यांच्यातील प्रचंड तफावत ही चिंतेची बाब आहे.

**औषधांच्या किमतीवर नियंत्रण असूनही प्रश्न कायम**

औषधे जीवनावश्यक वस्तू म्हणून नियमनाच्या कक्षेत येतात. औषध किंमत नियंत्रण आदेशाच्या माध्यमातून सरकारला किमती नियंत्रित करण्याचा अधिकार आहे. मात्र राष्ट्रीय अत्यावश्यक औषधांच्या यादीत समाविष्ट औषधांनाच कमाल किमती निश्चित करण्याची सध्याची व्यवस्था आहे; इतर औषधांच्या किमतींवर देखरेख ठेवली जाते. परिणामी काही औषधांच्या किमती निश्चित करण्यासाठी उत्पादकांना मोठी मुभा राहते.

यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नफ्याची साखळी. उत्पादक, वितरक, घाऊक विक्रेता, किरकोळ विक्रेता आणि रुग्णालय अशा अनेक टप्प्यांवर नफा जोडला जातो. रुग्णाला मात्र या संपूर्ण साखळीतील प्रत्यक्ष खरेदी किंमत आणि प्रत्येक टप्प्यावरचा नफा माहीत नसतो. माहितीची ही अपारदर्शकता अवाजवी किंमत आकारणीला खतपाणी घालू शकते.

**सर्वोच्च न्यायालयाची नाराजीही महत्त्वाची**

कर्करोगावरील औषधांच्या किमतीबाबत सर्वोच्च न्यायालयासमोर असलेल्या प्रकरणातही रुग्णांकडून किरकोळ विक्रेत्याच्या खरेदी किमतीच्या तुलनेत मोठी रक्कम आकारली जात असल्याचा मुद्दा उपस्थित झाला आहे. न्यायालयाने किरकोळ विक्रेत्याच्या नफ्यावर मर्यादा घालण्याच्या शक्यतेचाही विचार सुचवला आहे. ही बाब केंद्र आणि राज्य सरकारांनी गांभीर्याने घेण्याची गरज आहे. कारण आरोग्यसेवा ही सामान्य ग्राहक बाजारपेठेसारखी नाही. साबण किंवा बिस्किटाचा ब्रँड ग्राहक स्वतः निवडू शकतो; पण रुग्णाला औषध किंवा वैद्यकीय उपकरणाची निवड स्वतःच्या इच्छेने करता येत नाही. त्याला डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे या क्षेत्रातील पारदर्शकता अधिक कडक असायला हवी.

**रुग्णाला माहिती आणि निवडीचा अधिकार मिळायलाच हवा**

रुग्णालयाच्या बिलामध्ये प्रत्येक औषध किंवा वैद्यकीय उपकरणाची एमआरपी, रुग्णाकडून आकारलेली किंमत, उत्पादकाचे नाव आणि शक्य असल्यास प्रत्यक्ष खरेदी किंमत स्पष्टपणे नमूद करण्याची व्यवस्था असायला हवी. एकाच प्रकारच्या वस्तूंचे उपलब्ध ब्रँड आणि त्यांचे दर रुग्णांना सहज उपलब्ध करून दिले पाहिजेत. रुग्णाला परवडणारा पर्याय निवडण्याचा अधिकार असणे हा त्याच्या उपचारातील महत्त्वाचा भाग आहे. रुग्णालयात बाहेरून औषधे किंवा वैद्यकीय उपकरणे आणण्याची कायदेशीर मुभा असेल, तर किंमतीतील कृत्रिम वाढ रोखण्यास मदत होऊ शकते.

**नफ्यावर वाजवी मर्यादा आवश्यक**

नफा कमावणे चुकीचे नाही; पण रुग्णाच्या असहायतेचा फायदा घेऊन अवाजवी नफा कमावणे निश्चितच गंभीर प्रश्न निर्माण करते. त्यामुळे वितरक, किरकोळ विक्रेते आणि रुग्णालये या साखळीतील प्रत्येक टप्प्यावर वाजवी नफ्याची मर्यादा निश्चित करण्याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. यापूर्वी कर्करोगावरील काही औषधांवर व्यापार नफ्याची मर्यादा निश्चित केल्याने त्यांच्या किमती कमी झाल्याचे उदाहरणही आहे. त्यामुळे वैद्यकीय उपकरणे आणि रुग्णालयात रोज वापरल्या जाणाऱ्या 'कंज्युमेबल्स'साठीही अशीच नियामक चौकट तयार करता येऊ शकते.

**कमिशनच्या साखळीवरही अंकुश हवा**

औषधांच्या विपणनातील कमिशन, भेटवस्तू, प्रायोजकत्व किंवा इतर प्रोत्साहनांच्या पद्धतींवर नियंत्रण आणण्यासाठी असलेली आचारसंहिता अधिक प्रभावीपणे लागू करण्याची गरज आहे. ती केवळ ऐच्छिक न राहता कायदेशीर चौकटीत आणल्यास उल्लंघन करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई करता येईल. त्याचबरोबर उत्पादकाची विक्री किंमत आणि छापील एमआरपी यातील कमाल फरक निश्चित करण्याचाही विचार झाला पाहिजे. राज्यांच्या औषध नियंत्रकांकडून होणारे बाजार सर्वेक्षण आणि एनपीपीएचा डेटा एकत्र केल्यास किंमतविषयक गैरप्रकार शोधणे अधिक सुलभ होईल.

**नियंत्रण करताना औषधांचा तुटवडा होणार नाही, याचीही काळजी**

किंमत नियंत्रणाची मागणी करताना दुसरी बाजूही लक्षात घ्यावी लागेल. अतिनियमनामुळे औषधांचे उत्पादन, वितरण किंवा उपलब्धता बाधित होऊ नये. संशोधन, उत्पादन आणि पुरवठा व्यवस्था आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य राहणेही आवश्यक आहे. त्यामुळे किंमत नियंत्रण हे आकडेवारी, उत्पादन खर्च आणि बाजारातील वास्तव यांचा अभ्यास करून टप्प्याटप्प्याने केले पाहिजे.

महाराष्ट्राने वैद्यकीय उपकरणांच्या किमतीच्या नियमनाच्या बाबतीत यापूर्वी पुढाकार घेतला आहे. स्टेंटच्या किमतीच्या नियमनासाठी महाराष्ट्र एफडीएने केलेल्या पाठपुराव्याचा उल्लेखही या संदर्भात महत्त्वाचा ठरतो.

रुग्ण आजाराशी लढत असतो; त्याच वेळी त्याला अवाजवी बिलाशीही लढावे लागू नये. आरोग्यसेवेत वाजवी नफा आवश्यक आहे; मात्र रुग्णाच्या असहायतेतून अमर्याद नफा कमावण्याची व्यवस्था स्वीकारता येणार नाही. पारदर्शक बिलिंग, नफ्यावर तर्कसंगत मयार्दा, रुग्णाला निवडीचा अधिकार आणि औषध विपणनातील गैरप्रकारांवर कठोर कारवाई—या चार दिशांनी केंद्र आणि राज्य सरकारांनी ठोस पावले उचलण्याची वेळ आली आहे.

आजारी माणसाच्या खिशावर उपचाराचा खर्च पडतोच; पण त्याच्या असहायतेवर नफ्याचा भार टाकला जाऊ नये, एवढी अपेक्षा तरी आरोग्यव्यवस्थेकडून ठेवता आली पाहिजे.

# शाळा बंद झाली की फक्त इमारत बंद होत नाही; गावाचे भविष्य बंद होते!

१९७२ चा दुष्काळ महाराष्ट्राच्या सामूहिक स्मृतीवर कोरलेला आहे. त्या काळात अन्नाची टंचाई होती, पाण्याची टंचाई होती, जनावरांसाठी चारा नव्हता. अनेक कुटुंबांनी उपासमार सहन केली. पण त्या कठीण काळातही एक गोष्ट काही लोकांनी जपून ठेवली—पुढच्या पेरणीसाठीचे बियाणे.

कारण त्यांना एक गोष्ट माहीत होती...

आजची भूक काही दिवसांची आहे; पण उद्याची शेती वाचवायची असेल तर बियाणे वाचले पाहिजे.

त्या पिढीला भविष्याची किंमत माहीत होती.

आज परिस्थिती वेगळी आहे. दुष्काळ तसाच नाही, उपासमार तशी नाही; पण एका वेगळ्या प्रकारची भीषण टंचाई आपल्या गावांमध्ये निर्माण होत आहे—शिक्षणाची टंचाई.

आणि दुर्दैव असे की, आपण ही टंचाई निर्माण होताना डोळ्यांसमोर पाहत आहोत.

एकेक करून सरकारी शाळा बंद होत आहेत.

कुठे पटसंख्या कमी आहे म्हणून शाळा बंद करण्याची वेळ येते. कुठे शिक्षकांची कमतरता आहे. कुठे पालकांचा सरकारी शाळांवरील विश्वास कमी झाला आहे. कुठे इंग्रजी माध्यमाच्या आकर्षणामुळे पालक आपल्या मुलांना खासगी शाळेत पाठवतात. आणि मग सरकारी शाळेतील विद्यार्थी कमी झाले की पुन्हा प्रश्न उपस्थित होतो—"शाळा कशासाठी चालवायची?"

पण हा प्रश्न उलटा विचारण्याची वेळ आली आहे.

विद्यार्थी कमी झाले म्हणून शाळा बंद करायची, की शाळा चांगली करून विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेकडे आणायचे?

हा फरक समजून घेतला नाही तर आपण केवळ शाळा बंद करणार नाही, तर गावाच्या सामाजिक भवितव्याची दारे बंद करू.

**शाळा म्हणजे चार भिंती नाहीत**

गावातील सरकारी शाळा म्हणजे केवळ वर्गखोली, फळा आणि बाके नव्हेत.

ती गावातील सर्वात महत्त्वाची सार्वजनिक संस्था आहे.

याच शाळेत शेतकऱ्याचा मुलगा शिकतो, मजुराचा मुलगा शिकतो, छोट्या दुकानदाराची मुलगी शिकते, गरीब कुटुंबातील मुलगा-मुलगी शिकतात. कुणाच्या घरात अभ्यासासाठी स्वतंत्र खोली नसते; कुणाकडे महागडी पुस्तके नसतात; कुणाला खासगी शिकवणी परवडत नाही./

पण गावातील शाळा त्यांच्यासाठी असते.

म्हणूनच सरकारी शाळा कमकुवत होणे म्हणजे गरीब आणि सामान्य कुटुंबांच्या शिक्षणाच्या संधी कमकुवत होणे.

आज आपण मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी लाखो रुपये खर्च करण्यास तयार आहोत; पण गावातील सरकारी शाळा वाचवण्यासाठी समाज म्हणून आपण किती जागे आहोत?

हा प्रश्न प्रत्येक गावाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

**१९७२ मध्ये बियाणे वाचवले; आज आपण काय वाचवणार?**

त्या काळातील शेतकऱ्याने हातात आलेले थोडेसे धान्य पूर्णपणे खाऊन टाकले नाही. त्याने त्यातील काही भाग पुढच्या पिढीसाठी राखून ठेवला.

कारण त्याला माहीत होते—

बियाणे संपले तर शेती संपते.

आज आपल्या गावातील शाळा म्हणजे आपल्या पुढच्या पिढीचे ज्ञानाचे बियाणे आहे.

तेच जर आपण दुर्लक्षित केले तर उद्या गावात पैसा असेल, रस्ते असतील, मोठमोठ्या इमारती असतील; पण सक्षम, सुशिक्षित आणि विवेकी पिढी नसेल.

मग विकासाचा अर्थ काय?

आज आपण शेतातील बियाणे जपतो; घरातील पैसा जपतो; जमीन जपतो; सोन्याचे दागिने जपतो.

पण सरकारी शाळा जपण्यासाठी आपण किती काळजी घेतो?

**शाळा बंद करण्यापूर्वी गावाला एक प्रश्न विचारा**

एखाद्या गावातील सरकारी शाळेत विद्यार्थी कमी झाले असतील तर ती शाळा बंद करणे हा सर्वात सोपा उपाय आहे.

पण प्रशासनाने आणि समाजाने त्याआधी काही प्रश्न विचारले पाहिजेत.

शाळेत पुरेसे शिक्षक आहेत का?

शाळेतील शिक्षणाची गुणवत्ता कशी आहे?

मुलांना आवश्यक सुविधा मिळतात का?

शाळेची इमारत, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, क्रीडा आणि डिजिटल साधने उपलब्ध आहेत का?

पालकांचा शाळेशी संवाद आहे का?

शिक्षकांना आवश्यक शैक्षणिक वातावरण मिळते का?

खासगी शाळांकडे पालक का वळत आहेत?

हे प्रश्न सोडवण्याऐवजी "पटसंख्या कमी) आहे" हा एकच निष्कर्ष काढून शाळा बंद करणे म्हणजे आजारावर उपचार करण्याऐवजी रुग्णालयच बंद करण्यासारखे आहे.

**सरकारी शाळा वाचवण्याची जबाबदारी फक्त सरकारची नाही**

सरकारची जबाबदारी सर्वात मोठी आहे, यात शंका नाही. चांगले शिक्षक, पुरेशा सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आवश्यक निधी उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारीच आहे.

पण गावाचीही काही जबाबदारी आहे.

ग्रामपंचायत, पालक, माजी विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक लोकप्रतिनिधी—सगळ्यांनी मिळून गावातील शाळेकडे पाहण्याची गरज' आहे.

"माझे मूल तर खासगी शाळेत आहे; सरकारी शाळेचे मला काय?" हा विचार धोकादायक आहे.

कारण आज तुमचे मूल खासगी शाळेत असेल; उद्या गावातील सार्वजनिक शिक्षण व्यवस्था मोडली तर त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर होणार आहे.

शिक्षण ही वैयक्तिक बाब नाही.

शिक्षित समाज ही सामूहिक संपत्ती आहे.

**गावाला आता काळजीची घ्यावी लागेल**

त्या पोस्टमधील एक वाक्य विशेष विचार करायला लावते—"या शाळांचा बीमोड होऊ नये, यासाठी आता गावाला काळजी घ्यावी लागेल."

हेच आजच्या काळाचे वास्तव आहे.

सरकारी शाळा वाचवण्याची चळवळ केवळ शाळेच्या इमारतीपुरती मर्यादित नसावी. गावाने ठरवले पाहिजे—

आपल्या गावातील शाळा बंद होऊ देणार नाही.

शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न करू.

पालकसभा नियमित घेऊ.

माजी विद्यार्थ्यांना शाळेशी जोडू.

शाळेतील गुणवत्तेचा आढावा घेऊ.

शिक्षक आणि पालक यांच्यात संवाद वाढवू.

मुलांना शिक्षणासोबत वाचन, विज्ञान, कला, क्रीडा आणि तंत्रज्ञानाची संधी देऊ.

शाळा चांगली झाली तर पालकांचा विश्वास परत येईल.

विश्वास परत आला तर विद्यार्थी परत येतील.

विद्यार्थी परत आले तर शाळा टिकेल.

आणि शाळा टिकली तर गावाचे भविष्य टिकेल.

**पुढची पिढी आपल्याला प्रश्न विचारणार आहे**

उद्या आपली मुले-मुली मोठी होतील. ते मागे वळून पाहतील.

ते विचारतील—

"तुमच्या काळात गावातील सरकारी शाळा बंद होत होत्या, तेव्हा तुम्ही काय केले?"

त्या प्रश्नाचे उत्तर आपल्याकडे असले पाहिजे.

आपण असे म्हणू शकले पाहिजे—

"हो, आम्ही संकट पाहिले होते. पण आम्ही गप्प बसलो नाही. गावाची शाळा वाचवण्यासाठी आम्ही प्रयत्न केले. कारण आम्हाला माहीत होते की शाळा म्हणजे गावाच्या भविष्यात पेरलेले बियाणे आहे."

१९७२ च्या दुष्काळातील पिढीने बियाणे जपले म्हणून पुढची शेती उभी राहिली.

आज आपल्यासमोर शिक्षणाचा प्रश्न उभा आहे.

आपण आपल्या पुढच्या पिढीसाठी ज्ञानाचे बियाणे जपणार आहोत का? की आपल्या डोळ्यांसमोर गावातील शाळेचे दार कायमचे बंद होताना पाहणार आहोत?

कारण लक्षात ठेवा—

दुष्काळाने शेत कोरडे पडते; पण शाळा बंद झाली तर पिढी कोरडी पडते.

आणि पुढच्या पिढीला माफ करता येणार नाही, अशी चूक आज आपण करू नये.



**श्रीम. डॉ. किरण हणमंत घाडगे**
(शिक्षिका)
जिल्हा परिषद
प्राथमिक शाळा, वेळापूर

# फॉर्म ६च्या वादाने निवडणूक आयोग अडचणीत

## 'सर्वोच्च न्यायालयाची मंजुरी नाही' CJI सूर्यकांत यांचे स्पष्ट निरीक्षण

**नवी दिल्ली (वृत्तसेवा):** विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण अर्थात रक्षप्रक्रियेदरम्यान वापरण्यात आलेल्या सुधारित ह्यफॉर्म ६ह्लवरून निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याभोवतीचा वाद आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सुनावणीदरम्यान सुधारित फॉर्म ६ ला सर्वोच्च न्यायालयाने कोणतीही मंजुरी दिलेली नसल्याचे स्पष्ट केले. तसेच हा बदल नेमका कोणी आणि कोणत्या प्रक्रियेत केला, यासंबंधीचे रेकॉर्ड पाहण्याचे संकेत न्यायालयाने दिले.

या निरीक्षणामुळे २६ सप्टेंबर रोजी निवडणूक आयोगाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकातील भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आयोगाने त्या वेळी रक्षसंदर्भातील निर्णयांना तिन्ही निवडणूक आयुक्तांची एकमताने मंजुरी असल्याचे सांगतानाच, फॉर्म ६ मधील बदलांना सर्वोच्च न्यायालयाच्या बिहार SIR प्रकरणातील निर्णयाचा आधार असल्याचे स्पष्ट केले होते.

दोन निवडणूक आयुक्तांच्या आक्षेपामुळे आधीच वाद. फॉर्म ६ मध्ये करण्यात आलेल्या बदलांबाबत निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी आक्षेप नोंदवल्याचे वृत्त यापूर्वी समोर आले होते. दोन्ही आयुक्तांनी गेल्या दहा महिन्यांत मतदार नोंदणी, मतदार यादीतील बदल आणि संबंधित तांत्रिक प्रक्रियांबाबत अनेक वेळा आक्षेप घेतल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. काही अहवालांनुसार अशा आक्षेपांची संख्या १४ होती.

विशेषतः फॉर्म ६ ला जोडण्यात आलेल्या अतिरिक्त घोषणेबाबत कायदेशीर व प्रक्रियात्मक प्रश्न उपस्थित करण्यात आले. या बदलासाठी संबंधित नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करणे गरजेचे असल्याचा मुद्दाही मांडण्यात आल्याचे वृत्त आहे.

**'सर्वोच्च न्यायालयाची मंजुरी' या दाव्यावरच आता प्रश्न**

२६ सप्टेंबरच्या निवडणूक आयोगाच्या भूमिकेनुसार SIR शी संबंधित निर्णय एकमताने घेण्यात आले होते आणि फॉर्म ६ मधील बदलांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार असल्याचे आयोगाने सांगितले होते. मात्र ५ ऑक्टोबरच्या सुनावणीत CJI सूर्यकांत यांनी कोणत्याही सुधारित फॉर्म ६ ला सर्वोच्च न्यायालयाने मंजुरी दिलेली नसल्याचे स्पष्ट केले.

यामुळे आता मुख्य प्रश्न असा उपस्थित झाला आहे की, फॉर्म ६ मध्ये बदल करण्याचा निर्णय नेमका कोणी घेतला, त्याला कोणाची मान्यता होती आणि तो बदल कोणत्या कायदेशीर अधिकाराच्या आधारे करण्यात आला?

सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात फौजदारी कारवाईची मागणी करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने फॉर्म ६ मधील कथित अनधिकृत बदल, निवडणूक आयोगातील निर्णयप्रक्रिया आणि SIR शी संबंधित निर्णयांवर गंभीर आक्षेप घेण्यात आले आहेत.

> या पार्श्वभूमीवर ज्ञानेशच्या काळातल्या सगळ्या निवडणुका आणि पोटनिवडणुका रद्द होऊ शकतात कारण त्या मुळातच बेकायदा आहेत. अर्थात सुप्रीम कोर्टाच्या निर्णयावर ते ठरेल. या देशाच्या लोकशाहीचा मोदी शहांनी ज्ञानेशकुमारच्या हातून खून केला हे मात्र सिद्ध झालं. अतिशय दुःखद असा हा काळ आहे भारतीय लोकशाहीसाठी.
>
> **- विरोधक**
>
> दोन निवडणुक आयुक्तांनी या आधीच आमची संमती घेतलेली नाही हे सांगितलं आहे. याचा अर्थ ज्ञानेशकुमारनं देशभरातून फॉर्म 6 हे डॉक्युमेंट बेकायदेशीरपणे भरून घेतलं आहे. मला वाटते ज्ञानेशकुमारवर फौजदारी खटला दाखल करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अर्थात ज्ञानेश सरकारसाठीच काम करत होता हे आता सिद्ध झालं आहे.
>
> **- जेष्ठ विचारवंत, विश्वंभर चौधरी**

मात्र आता सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणावरून ज्ञानेश कुमार यांच्यावर फौजदारी गुन्हा सिद्ध झाला आहे, असे विरोधक म्हणतात. त्याचप्रमाणे त्यांच्या कार्यकाळातील सर्व निवडणुका किंवा पोटनिवडणुका बेकायदेशीर ठरल्या आहेत, असाही विरोधकांचा दावा आहे. मात्र सध्या कोणताही अंतिम न्यायालयीन निर्णय झालेला नाही. न्यायालयाने संबंधित नोंदी आणि निर्णयप्रक्रियेचा कायदेशीर आधार तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, निवडणूक आयोगाने रक्षमधील निर्णय तिन्ही आयुक्तांच्या एकमताने झाल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच दोन आयुक्तांनी केलेले आक्षेप हे धोरणात्मक निर्णयांऐवजी प्रतिनियुक्त अधिकाऱ्याशी संबंधित बाबींशी निगडित असल्याचे आयोगाने सांगितले होते.

वाद वाढल्यानंतर आयोगाने काही राज्यांमध्ये SIR प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर फॉर्म ६ सोबत जोडलेली अतिरिक्त घोषणा मागे घेतली असून, संबंधित ठिकाणी पुन्हा वैधानिक फॉर्म ६ चा वापर करण्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त आहे.

**आता सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील भूमिकेकडे लक्ष**

फॉर्म ६ च्या बदलाचा निर्णय कोणत्या पातळीवर आणि कोणाच्या संमतीने झाला, याचा अधिकृत रेकॉर्ड न्यायालयासमोर आल्यानंतर या प्रकरणाची दिशा स्पष्ट होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर SIR प्रक्रियेदरम्यान घेतलेल्या निर्णयांची कायदेशीर वैधता, निवडणूक आयोगातील सामूहिक निर्णयप्रक्रिया आणि मतदारांच्या हक्कांवर त्याचा परिणाम या मुद्द्यांवरही न्यायालयीन तपासणी होऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने स्वतःच म्हटल्याप्रमाणे, संबंधित रेकॉर्ड समोर आल्यानंतर 'बदल नेमका कोणी केला?' हा प्रश्न महत्त्वाचा ठरणार आहे.

या संपूर्ण वादामुळे निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेपासून मतदार यादीच्या पारदर्शकतेपर्यंत अनेक मूलभूत प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत. मात्र या प्रकरणातील अंतिम कायदेशीर निष्कर्ष सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील आदेशांवरच अवलंबून राहणार आहेत.

# 'सुधारणा उत्सव (Reform Utsav)-2026' मध्ये जिल्ह्यातील नागरिकांनी सुधारणा सुचवण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** नागरिकांच्या सहभागातून प्रशासकीय, प्रक्रियात्मक, तांत्रिक व संरचनात्मक सुधारणा सुचविणे, त्यांचे परीक्षण करणे व त्यांची कालबद्ध अंमलबजावणी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या "सुधारणा उत्सव (Reform Utsav)-2026" या राष्ट्रव्यापी अभियानाची महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानाची सुरुवात सोलापूर जिल्ह्यात ही होत असल्याने अभियानात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन शासकीय सेवांमधील त्रुटींबाबत सुधारणा सुचवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले आहे.

दि. 1 सप्टेंबर 2026 च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयान्वये हे अभियान राबविले जात आहे. सदर अभियानाचा मुख्य उद्देश नागरिकांच्या अनुभवातून शासकीय सेवा वितरणातील त्रुटी, अनावश्यक प्रक्रिया, अनुपालनाचा भार व कागदपत्रांची पुनरावृत्ती कमी करून शासकीय सेवा अधिक सुलभ, गतिमान व पारदर्शक करणे हा आहे. या अभियानांतर्गत सर्व प्रशासकीय विभागांशी संबंधित नियम, सेवा वितरण, परवाने, मंजुरी, डिजिटल प्रणाली, आंतर-विभागीय कार्यपद्धती आणि संस्थात्मक रचना यांवर भर देण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय प्रशासकीय यंत्रणेचे अभियानाची उद्दिष्टे, कार्यपद्धती, पोर्टलचा वापर, सुधारणा निकष, विभागीय जबाबदाऱ्या आणि केंद्र शासनाशी समन्वय याबाबत संवेदनीकरण करण्यात येईल.

या मोहिमेसाठी डिजिटल माध्यमे, सामाजिक माध्यमे, प्रसारमाध्यमे, ग्रामपंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थांची यंत्रणा, शैक्षणिक संस्था, उद्योग व व्यावसायिक संघटना, स्वयंसेवी संस्था तसेच इतर संबंधित भागधारकांचा उपयोग करण्यात यावा. नागरिकांकडून सुधारणा सूचना "रिफॉर्म उत्सव" पोर्टल तसेच अधिकृत मदत कक्षामार्फत स्वीकारण्यात याव्यात. प्रत्येक सूचनेची डिजिटल नोंदणी करून तिला अद्वितीय क्रमांक देण्यात येईल. नागरिकांकडून सूचना स्वीकारण्याची प्रक्रिया दि. 31 ऑक्टोबर 2026 रोजी रात्री 12:00 वाजता बंद करण्यात येईल. न्यायालयीन किंवा न्यायाधिकरणीय विचाराधीन बाबींमध्ये न्यायालयीन कार्यवाहीवर परिणाम होईल अशी कोणतीही कार्यवाही सुधारणा उत्सव अभियानाच्या माध्यमातून करण्यात येऊ नये, असे आवाहन सर्व विभागप्रमुखांना करण्यात येत आहे, असे जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले.

# पुणे पदवीधर मतदारसंघातून मनोजकुमार गायकवाड यांचा अपक्ष अर्ज दाखल

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** पुणे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र संघटक अभियंता मनोजकुमार गायकवाड यांनी आज विधान भवन, पुणे येथे अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या उमेदवारीमुळे पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीचे राजकीय वातावरण अधिक रंगण्याची चिन्हे दिसत आहेत.

गायकवाड यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोजदादा आखरे, महाराष्ट्र मुख्य प्रवक्ते गंगाधर बनबरे, प्रदेश उपाध्यक्ष अभिमन्यू पवार यांच्यासह पुणे, सोलापूर, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनीही उपस्थिती लावत गायकवाड यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शविला.

पदवीधरांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडण्याचा निर्धार व्यक्त करत गायकवाड यांनी शिक्षित बेरोजगारांचे प्रश्न, रोजगाराच्या संधी, स्पर्धा परीक्षेतील अनियमितता, शैक्षणिक क्षेत्रातील समस्या, पदवीधरांचे हक्क आणि युवकांच्या भवितव्याचे प्रश्न हे निवडणुकीतील प्रमुख मुद्दे राहणार असल्याचे स्पष्ट केले.

पुणे पदवीधर मतदारसंघात पुण्यासह सोलापूर, सांगली आणि कोल्हापूर या चार जिल्ह्यांचा समावेश असल्याने गायकवाड यांच्या उमेदवारीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. चारही जिल्ह्यांतील पदवीधर मतदारांशी संपर्क वाढवून त्यांच्या समस्या जाणून घेण्यावर भर देणार असल्याचे त्यांच्या समर्थकांकडून सांगण्यात आले.



दरम्यान, प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांसमोर अपक्ष उमेदवार म्हणून मनोजकुमार गायकवाड यांनी आव्हान उभे केल्याने ही निवडणूक बहुरंगी होण्याची शक्यता आहे. संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांसह विविध सामाजिक संघटनांची साथ मिळाल्यास गायकवाड यांच्या उमेदवारीमुळे मतविभाजनाचे समीकरणही बदलू शकते.

'पदवीधरांच्या प्रश्नांसाठी केवळ आश्वासनांची नव्हे, तर ठोस भूमिका आणि संघर्षाची गरज आहे,ह्व या भूमिकेतून गायकवाड निवडणुकीच्या मैदानात उतरल्याने आगामी काळात त्यांचा प्रचार कोणत्या मुद्द्यांभोवती केंद्रित होतो आणि पदवीधर मतदारांचा त्याला कितपत प्रतिसाद मिळतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

पान १ वरून

# उजनीतील एआय प्रकल्पांबाबत...

जागा रिकामी करण्याच्या कारवाईचा कायदेशीर आधारही स्पष्ट करण्यास सांगितले आहे.

**जनसुनावणी घेण्याची मागणी**

शेतकरी, मच्छीमार, शेतमजूर, पशुपालक, ग्रामपंचायती, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अन्य संबंधित घटकांशी सल्लामसलत करून त्यांच्या हरकती व सूचनांवर काय कार्यवाही झाली, याची माहिती सार्वजनिक करावी. प्रकल्पाच्या सर्व घटकांचा — एआय कॅम्पस, डेटा सेंटर, फ्लोटिंग सोलर, ग्रीन हायड्रोजन, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि जमीन वापराचा — स्वतंत्र व एकत्रित पर्यावरणीय-सामाजिक परिणाम अभ्यास उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी मोहिते-पाटील यांनी केली आहे.

अंतिम पाणी आरक्षण, पाणीवापर परवानगी आणि अन्य महत्त्वाच्या मंजुऱ्यांबाबत निर्णय घेण्यापूर्वी उजनीवरील विद्यमान पिण्याच्या पाण्याच्या व सिंचनाच्या गरजा सुरक्षित असल्याची खातरजमा करावी. तसेच संबंधित विभागांना निर्देश देऊन मागविलेली अधिकृत माहिती व प्रमाणित अहवाल निश्चित कालमर्यादेत उपलब्ध करून देत केलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल द्यावा, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

## वात्रटिका

**कुठे जाणार आहोत..**

बदलून गेली दुनिया
पुढेही बदलणार आहे...
ती लोकांना की लोक
तिला कुठे घेऊन जाणार...
त्या कोपऱ्यात तंटा आहे
इकडेही डोंब उसळला...
प्रेमाचा शेजार कमी झाला
निसर्गही धग घेऊन कोसळला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# वडदेगाव खुन खटला !

## हॉटेल मालक व कामगाराचा जामीन फेटाळला



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दत्ता नागनाथ बागल रा. वडदेगाव तालुका मोहोळ यास जीवे ठार मारल्या प्रकरणी व एकास गंभीर जखमी केल्या प्रकरणी हॉटेल मालक मंगेश सुरेश डोंगरे व त्याचा कामगार समर्थ संजय जगताप यांचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायाधीश यू एल जोशी यांनी फेटाळला.

यात हकीकत आशिकी, दिनांक २५/०४/२०२६ रोजी यातील मयत दत्ता व हॉटेल मालक मंगेश यांचेत पैशाच्या कारणावरून वाद झाला होता. तो वाद मिटविण्यासाठी दिनांक 27 4 2026 वडगाव ते औंढी येथील कॅनाल जवळ मयत दत्ता व त्याचे पुतणे व इतर आले होते. त्यावेळी आरोपी मंगेश व समर्थ देखील त्या ठिकाणी आले. त्यावेळी आरोपी मंगेश याने मयतास शिवीगाळ करून सोबत आणलेल्या चाकूने दत्ता यास पोटात छातीवर भोसकले त्यामुळे दत्ता हा गंभीर जखमी होऊन खाली पडला त्यावेळी सोडवण्यासाठी समाधान जाधव हा मध्ये गेला असता त्यासही मंगेशी आणि चाकूने गंभीर जखमी केले. तर दुसरा आरोपी समर्थ याने शिवीगाळ करून लाथा बुक्क्याने मारहाण केली. अशा आशयाची फिर्याद मयताचा पुतण्या विठ्ठल नरसु बागल याने कामती पोलीस ठाण्यात दिली होती.

जामीन मिळण्यासाठी आरोपींनी जिल्हा व सत्र न्यायालयात जामीनाचा अर्ज दाखल केला होता.

अर्जाच्या सुनावणीच्या वेळी पोलिसांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरून व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांवरून आरोपींविरुद्ध सकृत दर्शनी असा ठोस पुरावा असल्याचा युक्तिवाद मांडला त्यावरून न्यायाधीशांनी आरोपी हॉटेल मालक व नौकराचा जामीन अर्ज फेटाळला.

यात सरकार तर्फे ॲड आनंद गोरे तर मूळ फिर्यादी तर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. विनोद सूर्यवंशी, ॲड संगम मोरे, ॲड ओंकार भुसे यांनी काम पाहिले.

# वेतनातील अन्यायाविरोधात मुख्याध्यापिका अत्तार यांचे आंदोलन

## शिक्षणाधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर तूर्तास स्थगित



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मजरेवाडी परिसरातील भारत उर्दू विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शाहीन अत्तार यांनी प्रशासकीय छळवणूक आणि वेतनातील अन्यायाविरोधात जाहीर केलेले सोमवारचे मुंडन व उपोषण आंदोलन तूर्तास स्थगित केले आहे. कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे व पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या महत्त्वपूर्ण मध्यस्थीनंतर आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी विशाल मुळे यांनी मागण्यांची दखल घेत लेखी आश्वासन दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

मुख्याध्यापिका शाहीन अत्तार या संबंधित संस्थेमध्ये मागील २२ वर्षांपासून कायम मुख्याध्यापिका, तर ५ वर्षे प्रभारी मुख्याध्यापिका म्हणून सेवा बजावत आहेत. मात्र, गेल्या काही काळापासून त्यांच्या सेवाविषयक बाबींमध्ये गंभीर प्रश्न निर्माण झाले होते. नियमानुसार वार्षिक वेतनवाढ व प्रलंबित वेतन मिळणे, तसेच शालार्थ प्रणालीतील कथित कारवाईमुळे प्रलंबित राहिलेले वेतन मंजूर करणे या त्यांच्या प्रमुख मागण्या होत्या. ५ ऑक्टोबरपर्यंत मागण्यांवर लेखी व ठोस कारवाई न झाल्यास सोलापूर जिल्हा परिषदेच्या पूनम गेटसमोर प्रतीकात्मक मुंडन आंदोलन व उपोषण करण्याचा इशारा त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात दिला होता.

या इशाऱ्याची प्रशासनाने तातडीने दखल घेतली. या संपूर्ण लढ्यात कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे आणि पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी मुख्याध्यापिका अत्तार यांना भक्कम पाठबळ दिले. त्यांनी या प्रकरणी शिक्षण प्रशासनाकडे पाठपुरावा करून सकारात्मक मध्यस्थी केली.

आमदार म्हात्रे व माजी आमदार सावंत यांच्या मदतीमुळे आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणाधिकाऱ्यांनी मुख्याध्यापिका अत्तार यांच्या प्रलंबित मागण्यांवर कायदेशीर व योग्य ती सकारात्मक कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिले. प्रशासनाकडून मिळालेल्या या लेखी खात्रीनंतर, अत्तार यांनी आपले नियोजित मुंडन आणि उपोषण आंदोलन तूर्तास स्थगित करत असल्याचे जाहीर केले. मागण्यांची वेळेत पूर्तता न झाल्यास पुढील पाऊल उचलण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे शहराध्यक्ष मुरलीधर कडलास्कर यावेळी उपस्थित होते.

# शक्तिदेवीच्या घटस्थापना पूजेसाठी पालकमंत्री गोरे यांना नगरसेवकांचे संयुक्त निमंत्रण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुंबई, रत्नागिरी, कोकण आणि पुणे परिसरात गणेशोत्सव ज्या उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा केला जातो, त्याच धर्तीवर शारदीय नवरात्र महोत्सवाच्या माध्यमातून शक्तिदेवीचा जागर अवघ्या महाराष्ट्रात सोलापूरमध्ये विशेषत्वाने पाहायला मिळतो. सोलापूरच्या या भक्तिमय आणि पारंपरिक नवरात्र महोत्सवाची सुरुवात घटस्थापनेपासून होत असून, या निमित्ताने शक्ती देवीचे प्राणप्रतिष्ठापना मिरवणुकीस तसेच पूजेसाठी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी उपस्थित राहावे, यासाठी भाजप नगरसेवक किसन जाधव, विनोद भोसले आणि बिजू प्रधाने यांनी त्यांची पुणे विभागीय कार्यालय येथे सोमवारी संयुक्तरीत्या भेट घेऊन निमंत्रण दिले. महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी नवरात्रोत्सव काळात महाराष्ट्रासह परराज्यांतून लाखो भाविक सोलापूरमार्गे तुळजापूरकडे जातात. तसेच कोजागिरी पौर्णिमेनिमित्तही मोठ्या संख्येने भाविक अनवाणी पायी तुळजाभवानीच्या दर्शनासाठी मार्गक्रमण करतात. त्यामुळे सोलापूरचा शारदीय नवरात्र महोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता शक्ती, श्रद्धा आणि भक्तीच्या जागराचे प्रमुख केंद्र ठरतो. या पार्श्वभूमीवर घटस्थापनेच्या दिवशी पालकमंत्री गोरे यांनी उपस्थित राहून शक्तिदेवीच्या पूजेत सहभागी व्हावे, अशी विनंती नगरसेवकांनी केली. या निमंत्रणाचा स्वीकार करत पालकमंत्री गोरे यांनी सोलापुरातील शारदीय नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने उपस्थित राहण्याची ग्वाही दिली. दरम्यान, पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे भाजपचे अधिकृत उमेदवार कौस्तुभ मुरलीधर गावडे यांचीही किसन जाधव, विनोद भोसले आणि बिजू प्रधाने यांनी भेट घेतली. आगामी निवडणुकीसाठी त्यांना शुभेच्छा देत विजयासाठी सदिच्छा व्यक्त करण्यात आली. मोठ्या मताधिक्याने विजयी व्हावे, अशा शुभेच्छाही यावेळी नगरसेवकांनी दिल्या.

# योगासन स्पर्धेत प्रणिती खिलारे, तनुजा लोखंडे प्रथम, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** महा किड्स, नातेपुते येथे ३ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या तालुकास्तरीय योगासन स्पर्धेत सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालय, नातेपुतेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. इयत्ता अकरावी विज्ञान शाखेतील प्रणिती खिलारे आणि इयत्ता बारावी विज्ञान शाखेतील तनुजा लोखंडे यांनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर आपापल्या गटात प्रथम क्रमांक मिळविला. या यशामुळे दोन्ही विद्यार्थिनींची जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील, संस्थेचे मार्गदर्शक डॉ. धवलसिंह प्रतापसिंह मोहिते-पाटील, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे कार्याध्यक्ष, मार्गदर्शिका उर्वशीराजे मोहिते-पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवानराव साळुंखे तसेच ज्युनियर विभागाचे पर्यवेक्षक प्रा. बी. टी. वाघमोडे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

या विद्यार्थिनींना प्रा. नारायण माने यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल महाविद्यालय परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.

# तायक्वांदो स्पर्धेत नेताजी प्रशालेची पाच पदकांची कमाई





**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** येथील निलम नगर भागातील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेने शहरस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत दोन सुवर्ण व तीन कांस्य अशी एकूण पाच पदके पटकावली.

सोलापूर महानगरपालिका, जिल्हा क्रीडा कार्यालय, सोलापूर व तायक्वांदो असोसिएशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत प्रशालेच्या खेळाडूंनी मिळवलेले यश पुढीलप्रमाणे-हर्षिता करेमोलू-१४ वर्षे वयोगट, मुलींचा ३२ किलो वजन गट (सुवर्णपदक), श्रेया करेमोलू-२३ किलो वजन गट (सुवर्णपदक) साईका बुधराम - १७ वर्षे वयोगट, ६० किलो वजन गट- (कांस्यपदक) लक्ष्मी म्हेत्रे -३५ किलो वजन गट (कांस्यपदक),अंबादास दोंतूल -१४ वर्षे वयोगट, मुलांचा ३४ किलो वजन गट (कांस्यपदक) या यशस्वी खेळाडूंना प्रशालेचे क्रीडा शिक्षक विठ्ठल कुंभार व अशोक पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल प्रशालेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे तसेच सर्व शिक्षकवृंदाने विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# 'उद्योग महर्षी चषक' राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेचे विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते उद्घाटन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):** उद्योग महर्षी उदयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या 'उद्योग महर्षी चषक' राष्ट्रीय निमंत्रित बास्केटबॉल स्पर्धेचे अकलूज येथे अत्यंत उत्साही व भव्य वातावरणात उद्घाटन संपन्न झाले. अकलूज येथील विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुलात उदयसिंह क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते पार पडले.

या उद्घाटन सोहळ्यास शिवशंकर मध्यवर्ती सहकारी बझारच्या चेअरमन डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील, माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील, शिवरत्न उद्योग समूहाचे चेअरमन कीर्तीध्वजसिंह मोहिते पाटील, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील, देवन्या मोहिते-पाटील, नगरसेवक क्रांतिसिंह माने-पाटील, नगराध्यक्षा रेशमाताई अडगळे यांच्यासह सर्व नगरसेवक आदींची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय विविध संस्थांचे पदाधिकारी, मान्यवर आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी स्पर्धा प्रमुख अनिल जाधव, महेश ढेंबरे, अनिल उघडे, राहुल बोबडे, प्रकाश गायकवाड, शशांक गायकवाड, रोहित पवार यांच्यासह उदयसिंह क्रीडा मंडळाचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

पहिल्या दिवशी रंगले १६ रोमहर्षक सामने; नागपूर, मुंबई, बंगळुरू, पुणे, अमरावती, नांदेडचे वर्चस्व

उद्घाटनानंतर पहिल्या दिवशी विविध संघांमध्ये एकूण १६ चुरशीचे सामने खेळवले गेले. या सामन्यांचे निकाल खालीलप्रमाणे राहिलेः

१. एसएनजी नागपूर वि. यूकेएम अकलूजः एसएनजी नागपूर संघाने ३४-२१ अशा गुणांनी विजय मिळवला.

२. बंगळुरू वि. सोलापूर बॉलर्सः बंगळुरूने ८५-४१ अशा मोठ्या फरकाने विजय नोंदवला.

३. जय हिंद कडा, बीड वि. अलाहाबाद युनिव्हर्सिटी, प्रयागराजः जय हिंद कडा (बीड) संघाने ७३-४६ ने विजय मिळवला.

४. नागपूर अचीव्हर्स वि. अमरावतीः अमरावतीने अत्यंत चुरशीच्या लढतीत ५८-५६ अशा दोन गुणांच्या फरकाने विजय मिळवला.

५. एसकेबीए पुणे वि. ग्रीन स्टार, सोलापूरः एसकेबीए पुणे संघाने ५६-५५ असा एका गुणाने अटीतटीचा विजय मिळवला.

६. नेक्सस स्पोर्ट्स, नांदेड वि. बारामतीः नांदेड संघाने ६७-५६ ने बाजी मारली.

७. इंडियन जिमखाना, मुंबई वि. विजयपुराः इंडियन जिमखाना मुंबईने ४४-२८ ने विजय मिळवला.

८. नेक्सस स्पोर्ट्स, नांदेड वि. सोलापूर बॉलर्सः नांदेड संघाने ५९-१५ असा एकतर्फी विजय मिळवला.

९. नागपाडा, मुंबई वि. बीएसयू बंगळुरूः नागपाडा मुंबई संघाने ८५-६७ ने शानदार विजय मिळवला.

१०. इंडियन जिमखाना, मुंबई वि. ग्रीन स्टार सोलापूरः मुंबईने ५७-५० अशा गुणांनी विजय मिळवला.

११. अलाहाबाद युनिव्हर्सिटी, प्रयागराज वि. नागपूर अचीव्हर्सः नागपूर अचीव्हर्सने ४७-३३ ने बाजी मारली.

१२. एसकेबीए पुणे वि. विजयपुराः पुणे संघाने ४८-२५ ने विजय नोंदवला.

१३. बंगळुरू वि. बारामतीः बंगळुरू संघाने ५९-५३ ने विजय संपादन केला.

१४. बीएसयू बंगळुरू वि. अकलूजः बीएसयू बंगळुरूने ५१-४३ ने विजय मिळवला.

१५. जय हिंद कडा, बीड वि. अमरावतीः अमरावतीने ६०-५५ अशा गुणांनी सामना जिंकला.

१६. नागपाडा, मुंबई वि. एसएनजी नागपूरः नागपाडा मुंबई संघाने ६४-५४ ने विजय मिळवला.

**आकर्षक बक्षिसे व चषक**

२ ते ४ ऑक्टोबर दरम्यान चालणाऱ्या या स्पर्धेत प्रथम क्रमांकास ₹७१,००१ व ट्रॉफी, द्वितीय क्रमांकास ₹५१,००१ व ट्रॉफी, तृतीय क्रमांकास ₹३१,००१ व ट्रॉफी, चतुर्थ क्रमांकास ₹२१,००१ व ट्रॉफी, तसेच उत्कृष्ट खेळाडूसाठी ₹५,००१ रोख व ट्रॉफी दिली जाणार आहे. स्पर्धेचा अंतिम सामना व बक्षीस वितरण समारंभ रविवार, ४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७:०० वाजता पार पडणार आहे. क्रीडारसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवावा, असे आवाहन उदयसिंह क्रीडा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शक्तिपूजा मंडळातर्फे यंदा 'रावण वध'चा हलता देखावा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बाळीवेस शक्तिपूजा व समाजसेवा मंडळाच्यावतीने यंदा ११ ते २५ ऑक्टोबर दरम्यान विविध सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे प्रमुख आकर्षण असलेला 'रावण वध' हा हलता देखावा साकारण्यात येणार असून त्याचे उद्घाटन १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता देवी मंडप येथे होणार असल्याची माहिती मंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष संकेत थोबडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

११ रोजी घटस्थापनेच्या दिवशी सकाळी ९ वाजता श्री मल्लिकार्जुन मंदिर, बाळीवेस येथून देवीच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, त्यानंतर घटस्थापना होईल. १२ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मल्लिकार्जुन मंदिर येथे सिक्युअर हॉस्पिटल व लायन्स क्लब सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य व नेत्रतपासणी शिबिर होणार आहे. यामध्ये रक्तदाब, रक्तशर्करा, बोन डेन्सिटी, ईसीजी व नेत्रतपासणी करण्यात येणार आहे. तसेच सीटी स्कॅन, एक्स-रे व एमआरआय तपासणीसाठी २५ टक्के सवलत कूपनचे वाटप करण्यात येणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजता देवी मंडप येथे 'रावण वध' या हलत्या देखाव्याचे उद्घाटन होईल.

१३ रोजी सकाळी १० वाजता वृक्षारोपण कार्यक्रम, तर १५ रोजी सायंकाळी ६ वाजता देवी मंडप येथे महिलांसाठी कुमकुम अर्चना कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. १८ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत मल्लिकार्जुन मंदिर येथे रक्तदान शिबिर होणार असून, त्याच दिवशी सायंकाळी ६.३० वाजता देवी मंडप येथे गंगाआरती होणार आहे.

१९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता भव्य महाआरती तसेच महिलांचा नारीशक्ती सन्मान कार्यक्रम होणार आहे. २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ९ वाजता सीमोल्लंघन कार्यक्रम, तर २५ ऑक्टोबर रोजी मल्लिकार्जुन मंदिर येथे पौर्णिमा पूजा व विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचा नागरिकांनी आणि भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन उत्सव अध्यक्ष प्रथमेश थोबडे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस जयप्रकाश आमनगी, उद्योजक अजित धुम्मा, निखिल थोबडे, उत्सव उपाध्यक्ष गणेश अक्कलकोटे, विजयकुमार वाले, शुभम तुकमाळी, इरेश डबरे आदी उपस्थित होते.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल
सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)
### अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता सिक्युरिटी गार्ड त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू

जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ | | ७ |
| | ■ | ■ | ८ | | ■ | ९ | | | | ■ | |
| १० | ११ | | | ■ | १२ | ■ | | ■ | | ■ | |
| १३ | | ■ | १४ | १५ | | १६ | ■ | १७ | | १८ | |
| १९ | | २० | ■ | २१ | | | | | ■ | | ■ |
| | ■ | २२ | २३ | | ■ | ■ | ■ | २४ | | | ■ |
| २५ | २६ | ■ | | ■ | २७ | | २८ | | ■ | ■ | २९ |
| ■ | ३० | ३१ | | ■ | | ■ | | ■ | ३२ | ३३ | |
| ३४ | | | ■ | ३५ | | ■ | ३६ | ३७ | | | ■ |
| ३८ | | ■ | ३९ | | | ■ | ४० | | ■ | ४१ | ४२ |
| ४३ | | ४४ | ■ | | ■ | ४५ | ■ | ४६ | ४७ | ■ | |
| ४८ | | | ■ | ४९ | | | | ■ | ५० | | |

**उभे शब्द :** १) रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार २) निसर्ग (हिंदीत) ३) महिना ४) तुतारी ५) श्रीकृष्णाची आई ६) शिवसेनेचे एक माजी मंत्री-**** रावते ७) सैन्यदलाचा प्रमुख, सेनापती ११) डाळीपासून बनविलेले तिखट नसलेले कालवण १२) दाक्षिणात्य चित्रपट अभिनेता-*** हसन १५) वाद्यांचा होणारा आवाज, निनाद १६) दशा, अवस्था, मागच्या वेळी १७) मजबूत, कणखर १८) ढग (हिंदीत) २०) बशीचा साथीदार २३) गाणे गाणारा, गवई २६) अमिताभचा एक चित्रपट-मि. ****** २७) लाकूड कापण्याचे साधन २८) लोकजनशक्ती पार्टीचे संस्थापक नेते-स्व. रामविलास **** २९) एक आणि अर्धा ३१) पाणी निघून जाण्यासाठी खोदलेला खंदक ३२) कावळा ३३) स्पर्शाने लोखंडाचे सोने करणारा कथित घटक ३४) एक हिंदी न्यूज चॅनल ३५) किलोमधील चौथा भाग ३७) सैन्याला पुरवला जाणारा दाणागोटा ४२) एक प्रसिध्द आंबा ४४) रख उलट लिहा ४५) या राज्याची राजधानी पणजी आहे ४७) पाण्याचे बाष्परूप

**आडवे शब्द :** १) आ. प्रणिती शिंदे यांचे वडील
६) रात्रच्या विरूध्दार्थी शब्द ८) दहा (हिंदीत) ९) बोभाटा, बोलबाला
१०) त्वरेने, पटकन १३) जरचा साथीदार १४) गर्मीमुळे होणारी उलघाल, बेचैनी
१७) राजाची सभा १९) मऊ नसलेले, कडक
२१) पोहणे
२२) नोकरदाराला मिळणारे वेतन २४) कमळ (हिंदीत)
२५) पाऊस (इंग्रजीत) २७) लाकडी फळ्या ठोकून केलेले घराचे छत
३०) सततचा मागणीचा केलेला पाठपुरावा, तगादा
३२) वस्त्र ३४) एक म्हण-भीक नको पण कुत्रा ***
३५) मनी नाही भाव अन् देवा मला **
३६) पंढरपूरला पायी जाणारे भाविक ३८) रज उलट लिहा
३९) नवऱ्याची दुसरी बायको ४०) रक्तवाहिनी, शीर ४१) तीन दुणे
४३) मुस्लिम धर्मामध्ये पती-पत्नीचे एकमेकांपासून विभक्त होणे
४६) औषध (हिंदीत) ४८) रंग (इंग्रजीत)
४९) शासकीय कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा दिवस
५०) वरून काटेरी पण आतून गोड असणारे कोकणात मिळणारे एक फळ

## सुडोकु - 70

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | | | 1 | | | | | 2 |
| 8 | | 1 | | 9 | | | | |
| | 7 | 5 | | 8 | 4 | | | |
| 4 | 3 | | | 2 | | 5 | 6 | 1 |
| 5 | 1 | 8 | 7 | | | 4 | | 9 |
| | 9 | 6 | 4 | 1 | | 3 | | |
| | | | | 7 | | | | |
| | 6 | | | 3 | 1 | | 5 | |
| 7 | | 2 | 5 | 4 | | 6 | | 3 |

# जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडून मंगळवेढा-सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीची पाहणी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, कोरड्या पडलेल्या विहिरी तसेच जनावरांसाठी उपलब्ध चाऱ्याची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व मागण्या जाणून घेतल्या. तसेच पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सरसकट पंचनामे करून नुकसानीची वस्तुनिष्ठ व अचूक नोंद घेण्याच्या सूचना दिल्या.



मंगळवेढा तालुक्यातील गणेशवाडी, आंधळगाव, लेंडवे चिंचोळी आणि शिरसी या गावांना जिल्हाधिकाऱ्यांनी भेट देऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. तसेच कोरड्या पडलेल्या विहिरी, पाण्याची उपलब्धता आणि जनावरांसाठी उपलब्ध चाऱ्याची माहिती घेतली. शेतकऱ्यांशी संवाद साधताना पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि चाऱ्याची उपलब्धता याबाबत त्यांनी माहिती जाणून घेतली.

लेंडवे चिंचोळी येथे टँकरद्वारे सुरू असलेल्या पाणीपुरवठ्याची जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. टँकरमधून नागरिकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत आहे किंवा नाही, याची माहिती घेतली. तसेच पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या टँकरला जीपीएस यंत्रणा बसविण्यात आली आहे किंवा नाही, याचीही त्यांनी प्रत्यक्ष तपासणी केली. पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये नागरिकांना नियोजित वेळेनुसार व आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या.

यानंतर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सांगोला तालुक्यातील वाकी (घेरडी), बुरलेवाडी, वाडेगाव, वाणीचिंचोळी आणि राजापूर या गावांना भेटी देऊन दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता, विहिरींची पाणीपातळी, जनावरांसाठी उपलब्ध चारा तसेच पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली.

दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

उपविभागीय अधिकारी अमित माळी यांनी मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली. तसेच दोन्ही तालुका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती देऊन पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सरसकट करण्यात येत असल्याचे सांगितले. निर्धारित कालावधीत पंचनाम्यांचे अहवाल जिल्हा प्रशासनास सादर करण्यात येतील, अशी माहिती त्यांनी दिली.

यावेळी मंगळवेढा तहसीलदार मदन जाधव, सांगोला तहसीलदार बाळूबाई भागवत, मंगळवेढा तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ, सांगोला तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव, संबंधित मंडल अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक तसेच संबंधित गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शेतकऱ्यांशी संवाद व त्यांच्या मागण्या

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दोन्ही तालुक्यांतील शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व मागण्या जाणून घेतल्या. यावेळी नुकसानीचे पंचनामे पूर्ण करून शासनाकडून मदत मिळण्यासाठी प्रशासनामार्फत वेळेत प्रस्ताव सादर करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

यावेळी मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील विविध गावांतील शेतकऱ्यांनी पिकांच्या नुकसानीपोटी मिळणारे अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावे, अशी मागणी केली. तसेच पिण्याच्या पाण्याचे नियोजन व जनावरांसाठी पाणी व चाऱ्याचे नियोजन करावे. चाऱ्याची कमतरता निर्माण झाल्यास चाऱ्यासाठीचे अनुदानही थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात उपलब्ध करून द्यावे. चारा डेपो किंवा चारा छावण्या सुरू करण्याऐवजी थेट आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणीही शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

# दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध - पालकमंत्री जयकुमार गोरे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील सर्व 11 तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांच्या पीक नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम प्रशासनामार्फत सुरू आहे. पंचनाम्यांचे अहवाल शासनास सादर झाल्यानंतर शासनाच्या निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासन व प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, अशी ग्वाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.



दुष्काळी परिस्थिती तसेच पाणीटंचाईच्या अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी माढा तालुक्यातील तुळशी येथील शेतकरी व ग्रामस्थ यांची भेट घेतली त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार सुभाष देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, रणजीत शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, माढा उपविभागीय अधिकारी जयश्री आव्हाड, तहसीलदार संजय भोसले यांच्यासह दुष्काळ निवारणाशी संबंधित विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत पीक नुकसानीचे पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. नुकसान झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याच्या शंभर टक्के नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी पंचनाम्यांपासून वंचित राहणार नाही, तसेच पंचनामे न झाल्यामुळे कोणताही पात्र शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

पंचनाम्यांची कार्यवाही अचूक व पारदर्शक पद्धतीने पूर्ण करून अहवाल शासनाकडे सादर करण्यात येतील. त्यानंतर शासनाच्या निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्यात येईल, असेही पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

तुळशी गावातील शेतकऱ्यांनी जनावरांसाठी चारा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने चारा डेपो सुरू करण्याची मागणी केली. या मागणीची दखल घेत चारा डेपो सुरू करण्याबाबतचा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात येईल, असे पालकमंत्र्यांनी सांगितले. तसेच तुळशी गावातील शेतकऱ्यांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. गावात पाणीटंचाई निर्माण होऊ नये, यासाठी योग्य नियोजन करून आवश्यक उपाययोजना करण्याबाबत प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पीक नुकसानीचे पंचनामे वेळेत व अचूकपणे पूर्ण करणे आणि पाणी व चारा उपलब्धतेच्या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना करणे याला प्राधान्य देण्यात येत असल्याचे पालकमंत्री गोरे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी शेतकऱ्यांनी पीक नुकसान, पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा उपलब्धता तसेच चारा डेपो सुरू करण्याबाबतच्या मागण्या व अडचणी पालकमंत्र्यांसमोर मांडल्या.

# माढा लोकसभा मतदारसंघात भूजल पुनर्भरणासाठी व्यापक आराखडा तयार करा - खा. धैर्यशील मोहिते-पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघातील भूजल पातळी वाढविणे, पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे आणि भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी कृत्रिम भूजल पुनर्भरणाची कामे प्राधान्याने हाती घेण्याची मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केली.



यासंदर्भात खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आज जिल्हाधिकारी सोलापूर यांची भेट घेऊन निवेदन दिले.

माढा लोकसभा मतदारसंघातील संबंधित तालुके, गावे व पाणलोट क्षेत्रांचे सर्वेक्षण करून भूजल पातळी कमी असलेले व पाणीटंचाईग्रस्त भाग निश्चित करावेत, तसेच भूजल सर्वेक्षणाच्या आधारे योग्य ठिकाणी ARF (Artificial Recharge) स्पॉट व रिचार्ज पॉइंट निश्चित करावेत, अशी मागणी त्यांनी केली.

यासाठी रिचार्ज शाफ्ट, रिचार्ज विहिरी, परकोलेशन टँक, नाला खोलीकरण व रुंदीकरण, सिमेंट नाला बांध, गॅबियन बंधारे यांसह आवश्यक जलसंधारण कामांचा समावेश करण्याची सूचना करण्यात आली आहे. तसेच अस्तित्वातील तलाव, पाझर तलाव व बंधाऱ्यांचे पुनरुज्जीवन करून त्यांची भूजल पुनर्भरण क्षमता वाढविण्यावर भर देण्यात यावा.

प्रत्येक कामासाठी GPS लोकेशन, अंदाजित खर्च, संभाव्य भूजल पुनर्भरण क्षमता, लाभक्षेत्र व लाभार्थी शेतकरी यांची माहिती संकलित करून केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांमधून निधी उपलब्ध करण्याच्या शक्यता तपासाव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

संपूर्ण माढा लोकसभा मतदारसंघासाठी तालुकानिहाय व गावनिहाय ARF स्पॉट, रिचार्ज पॉइंट, प्रस्तावित कामे आणि आवश्यक निधीचा समावेश असलेला सविस्तर DPR तयार करावा अशी मागणी खासदार मोहिते-पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

# अरमान शेखचे वेस्ट झोन अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत कांस्यपदक

## चेन्नई येथील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



**कुमठे, प्रतिनिधी (कटूसत्य वृत्त):-** गोवा-पणजी येथे दि. २७ ते ३० सप्टेंबरदरम्यान पार पडलेल्या ३७व्या वेस्ट झोन ज्युनिअर अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२६ मध्ये कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, कुमठे येथील विद्यार्थी अरमान अशपाक शेख याने ५ किलोमीटर रेस वॉक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक मिळवून कांस्यपदक पटकावले.

अरमान शेखच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याची चेन्नई येथे होणाऱ्या कनिष्ठ राष्ट्रीय अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कुमठे कनिष्ठ महाविदयालयातील या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावर मिळवलेल्या या यशाबद्दल कुमठे परिसरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

अरमानच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव माने, संस्थेचे विश्वस्त तथा सोलापूर महानगरपालिका नगरसेवक जयकुमार माने, प्रा. स्वातीताई माने, कुमठे प्रशालेचे मुख्याध्यापक अंबादास रेडे, उदयोजक राजकुमार ताकमोगे, कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख प्रा. संजय जाधव, लिटल स्टार इंग्लिश मीडियम स्कूल, कुमठेच्या मुख्याध्यापिका शुभांगी पवार, पर्यवेक्षक विजयसिंह क्षिरसागर क्रीडा शिक्षक संजय घोडके, दीपक शिंदे व विक्रम पवार यांनी त्याचे अभिनंदन केले.

अरमानला मिळालेल्या या यशामागे प्रशिक्षक व क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन तसेच त्याची मेहनत, सातत्य आणि जिद्द महत्त्वाची ठरली. चेन्नई येथे होणाऱ्या कनिष्ठ राष्ट्रीय अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेतही अरमान उत्कृष्ट कामगिरी करून महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# बलिदान, त्याग अन देशभक्तीचा प्रवास

## अक्कलकोटमध्ये सावरकरांचा जीवनपट सादर



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** येथील स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने व्याख्यानमालेचे सहावे पुष्प लेखक नितीन वाघ यांच्या "…. म्हणून स्वातंत्र्यवीर" स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावर आधारित बलिदान, त्याग, देशभक्ती स्वदेशीनारा, जातीय निर्मूलन, अखंड भारत या बद्दल असलेली तळमळ आदी जीवनपट साधिक अभिनयातून उलगडला.

प्रारंभी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन तीर्थचे बसवराज शास्त्री, उद्योजक प्रशांत लोकपुरे, नगरसेवक प्रवीण शहा, रवि जोशी आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान दीकपाल लांजेकर, प्रसन्न केतकर, अवधूत गांधी, स्मिता शेवाळे, तेजना गुंजाळ, रमा कुलकर्णी आदींचा सत्कार मलकप्पा भरमशेट्टी, निनाद शहा, मेघा बिराजदार, नगरसेविका अपर्णा सिद्धे यांच्या हस्ते करण्यात आले.

विनायक सावरकर हे स्वातंत्र्य लढ्यातील एक क्रांतिकारक, विचारवंत, लेखक आणि समाज सुधारक होते स्वातंत्र्यवीर वयाच्या पंधराव्या वर्षी भारताला इंग्रजाकडून मुक्त करण्यासाठी शपथ घेतली आणि शेवटच्या श्वासापर्यंत संघर्ष केला. इंग्रजांनी त्यांना पन्नास वर्षे काळया पाण्याच्या जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ते न डगमगता अंदमान येथील सेल्युलर जेलमध्ये शिक्षा भोगली. ब्रिटन मधून भारतात आणले जात असताना 1910 मध्ये मारसेल्स बंदरजवळ त्यांनी चालत्या जहाजातून समुद्रात उडी मारून देशभक्तीचे उदाहरण घडवले. रत्नागिरीत असताना त्यांनी अस्पृश्यता निवारण, जातभेद निर्मूलन आणि पतीत पावन मंदिराची स्थापना यासह विविध सामाजिक चळवळीचे नेतृत्व केले. सन 1905 मध्ये स्वदेशीचा नारा देत परदेशी कापडांची होळी केली 1906 मध्ये बॅरिस्टर होण्यासाठी ते लंडनला गेले. तेथूनच ते भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी चळवळ सुरू केली. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावरील सत्य परिस्थिती सांघिक अभिनयाच्या माध्यमातून सादर करण्यात आले.

यावेळी सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, प्रतिष्ठानचे संयोजक जेष्ठ नेते मल्लिनाथ कल्याणशेट्टी, अशोक येणगुरे, मनोज कल्याणशेट्टी, मल्लिनाथ मसुती, संतोष जिरोळे, चंद्रकांत दसले, गुरुपादप्पा आळगी प्रभाकर मजगे, मल्लिनाथ स्वामी, विलास कोरे, महेश कापसे, भीमराव साठे, शिवशरण जोजन, बापूजी निंबाळकर, खंडेराव घाटगे, दयानंद बिडवे, प्रशांत शिंपी, यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुंजन पाटील यांच्या 'जाऊ कवितांच्या गावा' या काव्यकार्यक्रमातून अक्कलकोटकरांना घातली मोहिनी

**अक्कलकोट, (कटूसत्य वृत्त):-** कधी प्रेमाची हळुवार स्पंदने, कधी संसारातील गंमतीशीर अनुभव, तर कधी स्त्रीमनातील न बोललेल्या भावनांना शब्दरूप देत प्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांनी 'जाऊ कवितांच्या गावा' या काव्यकार्यक्रमातून रसिकांना कवितांच्या भावविश्वाची अनोखी सफर घडवली. प्रेमकवितांच्या ओघवत्या सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत आणली.मला आई व्हायचे नाही…, 'बायको, थोडी साधी…' यांसारख्या कवितांतून वैवाहिक जीवनातील गंमत, नात्यांमधील गोडवा आणि अपेक्षांचे विविध पैलू उलगडले, तर 'तुमच्यात काय कला आहे, तुमच्यात कृष्णलीला आहे, मला माहीत आहे,' अशा ओळींनी रसिकांचे लक्ष वेधून घेतले. साध्या, सहज आणि मिश्कील शब्दांतून मानवी स्वभावाचे दर्शन घडविणाऱ्या त्यांच्या कवितांनी उपस्थितांना कधी हसवले, तर कधी प्रेमाच्या भावविश्वात रमवले.



### कवितांमधून उलगडले नात्यांचे रंग

कविता ही केवळ शब्दांची रचना नसून ती माणसाच्या मनातील न बोललेल्या भावनांना अभिव्यक्त करणारी कला आहे, याचा प्रत्यय गुंजन पाटील यांच्या सादरीकरणातून आला. प्रेम, संसार, स्त्रीमन आणि तरुणाईच्या भावविश्वाला स्पर्श करणाऱ्या या काव्यमैफलीने उपस्थित रसिकांना साहित्यिक आनंदाची अनुभूती दिली. 'जाऊ कवितांच्या गावा' या शीर्षकाला साजेशा भावपूर्ण वातावरणात रंगलेल्या या कार्यक्रमातून अक्कलकोटकरांना कवितांच्या माध्यमातून नात्यांचे विविध रंग अनुभवता आले.

प्रेम म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील आकर्षण नव्हे, तर त्यात दडलेली काळजी, समजूतदारपणा, अपेक्षा आणि भावनिक गुंतवणूकही असते, याची जाणीव गुंजन पाटील यांच्या कवितांतून झाली. स्त्रीमनातील हळवेपणा, कौटुंबिक नात्यांतील गुंतागुंत, संसारातील रोजच्या अनुभवांमधून उमटणाऱ्या भावना आणि तरुणाईच्या प्रेमाविषयीच्या कल्पना त्यांनी आपल्या शब्दांतून प्रभावीपणे मांडल्या. त्यांच्या कवितांमध्ये अनुभवांची सहजता आणि भावनांची तरलता जाणवत होती. दैनंदिन जीवनात सहज घडणाऱ्या प्रसंगांना कवितेचे रूप देत त्यांनी रसिकांना स्वतःच्या आयुष्यातील अनुभवांशी जोडून घेतले. त्यामुळे या कार्यक्रमाला केवळ काव्यवाचनाचे स्वरूप न राहता, प्रेम, नाती आणि भावनांचा वेध घेणारा संवादात्मक अनुभव लाभला. शब्दांमधील मिश्कीलपणा आणि भावनांमधील प्रामाणिकपणा यांचा सुरेख मेळ त्यांच्या सादरीकरणातून अनुभवायला मिळाला. प्रारंभी पत्रकार मारुती बावडे, प्रशांत भगरे, अरविंद पाटील, शिवा याळवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाला आमदार सचिन कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, अविनाश महागावकर, रेणुका महागावकर, डॉ.शिवराया आडवीतोटे,निलकंठ कापसे, राजू हिप्परगी, निनाद शहा, अतुल कोकाटे, प्रमोद लोकापुरे, प्रकाश घिवारे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खंडेराव घाटगे यांनी केले.

# पोषण आहाराचे स्वयंपाकी उपाशी

## एप्रिल महिन्यापासून मानधन थकले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील शाळांमध्ये 'प्रधानमंत्री पोषण निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना दररोज गरम आणि सकस मध्यान्ह भोजन शिजवून देणाऱ्या स्वयंपाकी व मदतनीसांचे एप्रिल २०२६ पासूनचे मानधन रखडले आहे. दरमहिन्याला बिले जमा करण्यात येत आहेत. मात्र, शासनाकडून अद्यापही मानधनच प्राप्त झाले नाही.

अत्यंत कमी असलेले मानधन, त्यातही ते वेळेवर मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांवर कर्ज आणि उधारी काढून कुटुंबाचा गाडा चालवण्याची गंभीर वेळ आली आहे. शासनाकडून पोषण आहाराच्या योजनांचेकौतुक केले जात असताना, ही योजना तळागाळात राबवणाऱ्या हातांनाच उपाशी ठेवल्याचे चित्र निर्माण झाले आहे. गर्भवती, स्तनदा माता आणि शालेय विद्यार्थ्यांचे पोषण सुधारावे म्हणून शासन कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करते. मात्र, शाळांमध्ये रोज सकाळी चुलीसमोर उभे राहून हजारो

विद्यार्थ्यांचे पोट भरणारे स्वयंपाकी आणि मदतनीस ५ ते ६ महिन्यांपासून मानधनाच्या प्रतीक्षेत आहेत.

जिल्ह्यात ७८३३ स्वयंपाकी -कर्मचाऱ्यांवर जबाबदारी जिल्ह्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये भोजन तयार करण्यासाठी एकूण ५,६२६ स्वयंपाकी तथा मदतनीस कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांच्या कष्टामुळेच रोज वेळेवर विद्यार्थ्यांच्या ताटात गरम अन्न पोहोचते.

### रोज ४ लाख ५६ हजार विद्यार्थ्यांना पोषण आहार

जिल्ह्यात जिल्हा परिषद, महापालिका व खासगी अनुदानित शाळांमधील ४ लाख ५६ हजार विद्यार्थ्यांना रोज मध्यान्ह भोजन दिले जाते. विद्यार्थ्यांची पटसंख्या टिकवून ठेवणे आणि त्यांच्यातील कुपोषण रोखणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. पोषण करणारेच

'स्पर्श' प्रणालीवर कर्मचाऱ्यांची माहिती अद्ययावत करण्याचे काम वेगाने सुरू आहे. वरिष्ठ पातळीवरून निधी प्राप्त होताच सर्व थकीत मानधन कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात थेट वर्ग करण्यात येईल. महिन्याला २ कोटी रुपये मानधन मिळणे अपेक्षित आहे.

उपाशीपोटी, मानधनच नाही मयूर पाटील, अधीक्षक, शालेय पोषण

पोषणाची काळजी घेणारे स्वयंपाकी स्वतःच्या कुटुंबाचे पोषण कसे करायचे, या चिंतेत आहेत. एप्रिलपासून मानधन न मिळाल्याने किराणा दुकानदारांची उधारी, वैद्यकीय खर्च मुलांच्या शिक्षणाचा खर्च कसा भागवायचा, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

### 'स्पर्श' प्रणालीची काय अडचण ?

पोषण आहार योजनेतील कर्मचाऱ्यांचे मानधन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी स्पर्श प्रणाली लागू करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांची बँक खातीआधारशी लिंक नसणे, प्रणालीवरील माहितीचे अपूर्ण अपडेट आणि सर्व्हरच्या समस्या यामुळे मानधन जमा होण्यास मोठी अडचण निर्माण झाली आहे.

# रेल्वेच्या ३री व ४थी लाईनमुळे भूसंपादन प्रक्रियेसंदर्भात शेतकऱ्यांना नोटिसा

## योग्य मोबदला, पाणंद रस्ते आणि सिंचन व्यवस्थेबाबत शेतकऱ्यांच्या चिंता

**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** पुणे-सोलापूर-वाडी रेल्वेमार्गावरील तिसऱ्या व चौथ्या रेल्वे लाईनच्या कामासाठी सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील विविध गावांमधील शेतजमिनी संपादित करण्यात येणार आहेत. या भूसंपादन प्रक्रियेसंदर्भात ११ जुलै २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असून, संबंधित शेतकऱ्यांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. मात्र, या प्रकल्पामुळे शेतीचे होणारे तुकडीकरण, पाणंद रस्त्यांचा प्रश्न, सिंचन व्यवस्थेवरील परिणाम आणि भूसंपादनाच्या मोबदल्याबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

भूसंपादनाबाबत शेतकऱ्यांचे आक्षेप संबंधित शेतकऱ्यांनी सुमारे महिनाभरापूर्वी कुडुर्वाडी येथील प्रांत कार्यालयात आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत. रेल्वेच्या जमिन संपादन लाईनसाठी तलाठी ऑफिसमधून लगतच्या शेतकऱ्यांना दि. ६ ऑक्टोंबर रोजी प्रांत ऑफिस कुडुर्वाडी येथे संबंधित शेतकऱ्यांना म्हणणे मांडण्यासाठी उपस्थित राहण्याबाबत नोटिसा बजावल्या आहेत. प्रशासनाने शेतकऱ्यांना योग्य पद्धतीने न्याय द्यावा हिच आपेक्षा आहे.

नोटिसा प्राप्त शेतकरी वाशिंबे तसेच भूसंपादन प्रक्रियेबाबत आपले आक्षेपही नोंदवले आहेत. रेल्वे मार्गाच्या विस्तारीकरणासाठी जमीन संपादित करताना शेतकऱ्यांच्या अडचणींचा विचार करून योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी केली जात आहे.

### अल्पभूधारक शेतकऱ्यांसमोर शेतीचा प्रश्न

रेल्वे लाईनमुळे अनेक शेतजमिनींचे दोन किंवा अधिक भाग होण्याची शक्यता आहे. विशेषतः अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमिनींचे तुकडे पडल्यास उर्वरित क्षेत्रावर शेती करणे आर्थिकदृष्ट्या अडचणीचे ठरू शकते. काही शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात जमीन संपादित होणार असल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्नही निर्माण होण्याची शक्यता आहे.

शेतीसाठी आवश्यक असलेली सलग जमीन विभागली गेल्यास मशागतीची कामे, यंत्रसामग्रीची ने-आण, पिकांची देखभाल आणि शेतमालाची वाहतूक यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे भूसंपादन करताना केवळ संपादित होणाऱ्या जमिनीचा विचार न करता उर्वरित जमिनीच्या वापरावर होणाऱ्या परिणामांचाही विचार करावा, अशी शेतकऱ्यांची भूमिका आहे.

### पारंपरिक पाणंद रस्ते बंद होण्याची भीती

अनेक शेतांपर्यंत जाण्यासाठी वर्षानुवर्षे वापरात असलेले पारंपरिक पाणंद रस्ते रेल्वे लाईनमुळे बंद होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. शेतात जाण्यासाठी पर्यायी रस्त्यांची व्यवस्था न झाल्यास शेतीची कामे करणे आणि उत्पादित माल बाजारपेठेत पोहोचवणे कठीण होऊ शकते. त्यामुळे रेल्वे मार्गाच्या दोन्ही बाजूंना शेतकऱ्यांना सहजपणे ये-जा करता येईल, अशी पर्यायी रस्त्यांची व्यवस्था करावी. आवश्यक त्या ठिकाणी अंडरपास किंवा अन्य योग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

### सिंचनाच्या पाइपलाइनचा प्रश्न ऐरणीवर

शेतजमिनींमधून जाणाऱ्या सिंचनाच्या पाइपलाइन रेल्वे लाईनच्या हद्दीत येत असल्याने त्या तुटण्याची किंवा स्थलांतरित करण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे पिकांना पाणीपुरवठा करण्याच्या व्यवस्थेत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. पाइपलाइन पुन्हा टाकण्यासाठी शेतकऱ्यांना अतिरिक्त खर्च करावा लागू शकतो.

शेतीचे नुकसान टाळण्यासाठी सिंचन व्यवस्थेचे योग्य नियोजन करावे, बाधित पाइपलाइनबाबत स्पष्ट धोरण ठरवावे आणि शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही, याची काळजी घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### विहिरी, फळझाडे व घरांचे स्वतंत्र मूल्यांकन करण्याची मागणी

भूसंपादन करताना केवळ जमिनीच्या क्षेत्रफळानुसार मोबदला निश्चित न करता जमिनीवरील विहिरी, तलाव, फळझाडे, घरे आणि इतर कायमस्वरूपी मालमत्तांचे स्वतंत्र मूल्यांकन करावे, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

गावनिहाय आणि गटनिहाय जमिनीचे प्रत्यक्ष मोजमाप योग्य पद्धतीने करून जमिनीचा प्रकार, सिंचनाची उपलब्धता, उत्पादनक्षमता आणि इतर संबंधित बाबी विचारात घ्याव्यात. त्यानंतर पारदर्शक पद्धतीने योग्य बाजारमूल्य निश्चित करावे, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

### मोबदल्याच्या पद्धतीबाबत शासनाने स्पष्टता द्यावी

भूसंपादनासाठी मोबदला कसा निश्चित केला जाणार, त्यामध्ये जमिनीचे बाजारमूल्य कसे ठरवले जाणार आणि जमिनीवरील बांधकामे, फळझाडे व सिंचन सुविधांचा विचार कसा केला जाणार, याबाबत शासनाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी होत आहे.

रेल्वे विकास हा सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या दृष्टीने महत्त्वाचा असला, तरी या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या जमिनीचे नुकसान, शेतीची व्यवहार्यता आणि उपजीविकेवर होणारे परिणाम यांचाही गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. भूसंपादनाची प्रक्रिया पारदर्शक ठेवून शेतकऱ्यांचे आक्षेप ऐकून घ्यावेत आणि त्यांच्या अडचणींवर योग्य तोडगा काढावा, अशी मागणी संबंधित शेतकरी करत आहेत.